नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७७ Issue - 177 | वार - मंगळवार दि. २४ नोव्हेंबर २०२६ Blow- Tuesday Date 24 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

एनटीएच्या परीक्षा आयोजनात राज्य शासनाचा सहभाग वाढवण्यावर भर

उच्चस्तरीय समितीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राष्ट्रीय परीक्षा संस्था आयोजित करत असलेल्या विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांचे आयोजन अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि सुरळीत करण्यासाठी राज्य शासनाचा सहभाग वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्चस्तरीय कृतीदलाचे अध्यक्ष नंदन निलेकणी यांच्यात मुंबईतील वर्षा निवासस्थानी बैठक झाली. परीक्षांच्या आयोजनात राज्य आणि केंद्र सरकारमधील समन्वय अधिक प्रभावी करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

प्रत्येक जिल्ह्यात परीक्षा केंद्रांची उपलब्धता वाढवण्यावर भर

छद्म मार्फत मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या परीक्षांसाठी राज्यातील उपलब्ध पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर करण्यावर बैठकीत चर्चा झाली. प्रत्येक जिल्ह्यात आवश्यक परीक्षा केंद्रे उपलब्ध करून देणे, केंद्रांवरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि परीक्षा आयोजनासाठी आवश्यक लॉजिस्टिक व्यवस्था उभारणे या मुद्द्यांचा आढावा घेण्यात आला.

राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांचे आयोजन करताना केंद्रीय परीक्षा संस्था आणि राज्य शासन यांच्यात समन्वय असणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. परीक्षा केंद्रांवरील सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी राज्याची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

ग्रामीण आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी परीक्षा सुलभ करण्याचा विचार

ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी समान संधी मिळावी, यावरही बैठकीत भर देण्यात आला. इंग्रजी भाषेमुळे अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी परीक्षा प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने आवश्यक बदलांवर चर्चा झाली.



परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी सुरक्षित आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी अधिक परीक्षा संधी उपलब्ध करून देणे, अभ्यासक्रमानुसार परीक्षा पद्धती ठरवणे आणि स्पर्धा व प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही विचारविनिमय झाला.

बैठकीला उच्चस्तरीय कृतीदलाचे सदस्य उपस्थित

या बैठकीला कृतीदलाचे सदस्य डॉ. एस. सोमनाथ, शंकर मरुवाडा आणि राष्ट्रीय भरती संस्थेच्या (छठ) संचालक श्रुती सिंघल यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

छद्म च्या परीक्षा आयोजनात केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वय वाढवून विद्यार्थ्यांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि विद्यार्थी केंद्रित परीक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात आली.

जळोली येथील बोअरवेलमध्ये पडलेल्या दीड वर्षीय बालिकेचा मृत्यू



रात्रभर बचावकार्य; सकाळी बालिकेला बाहेर काढण्यात यश, मात्र मृत्यू झाल्याने हळहळ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील जळोली येथे शेतातील बंद बोअरवेलमध्ये पडलेल्या दीड वर्षीय बालिकेचा दुर्दैवी मृत्यू झाला. उष्मती राहुल गावित (वय १.५ वर्षे, रा. शिसा, ता. धडगाव, जि. नंदुरबार) असे मृत बालिकेचे नाव आहे. दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास जळोली येथील साखर कारखान्यालगत गोरख कांतिलाल नरसाळे यांच्या शेतातील बंद बोअरवेलमध्ये ऊसतोड मजुराची ही बालिका पडली होती. अंदाजे ४५ ते ५० फूट खोलवर बालिका अडकल्याची माहिती मिळताच प्रशासन व बचाव पथकांकडून तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, करकंब पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, बीट अंमलदार, पोलीस पाटील तसेच दोन बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. रात्रभर युद्धपातळीवर बचावकार्य सुरू होते. दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास बचाव पथकाला बालिकेला बोअरवेलमधून बाहेर काढण्यात यश आले. मात्र, या दुर्घटनेत बालिकेचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पाण्याची नासाडी केल्यास २००० रुपये दंड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

परभणी : राज्यात यंदा दुष्काळाची दाहकता आत्तापासूनच जाणवत असून अनेक जलसाठे कोरडे पडले आहेत. शेतातील तळे, विहिरींचेही पाणी आटल्याने शेतकरी चिंतातूर आहे. जनावरांना पाणी आणि चारा देण्याचा मोठा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा आहे. तर, शहरातील नागरिकांना मुलबक पिण्याचे पाणी पुरवण्याचंही आव्हान महापालिका, नगरपालिका प्रशासनापुढे आहे. त्याच पार्श्वभूमीवर मानवत (झरीलहरपळ) शहरात पाण्याची नासाडी करणाऱ्यांकडून २ हजार रुपये दंड आकारण्याचा निर्णय नगरपालिकेनं घेतला आहे.

ऐन दुष्काळात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना, पिण्याच्या पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर आता दंडात्मक कारवाई होणार आहे. परभणीच्या मानवत शहरात पाणी वाया घालवणाऱ्या नागरिकांना दोन हजार रुपयांचा दंड आकारण्याचा इशारा नगर परिषद प्रशासनाने दिला आहे. त्यासाठी प्रशासनाकडून जाहीर प्रकटनही प्रसिद्ध करण्यात आलंय. त्यामुळे, या निर्णयावर नागरिकांच्या संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून काहींनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. तर, काहींना ह्या निर्णयाला विरोधही दर्शवला आहे.

परभणी जिल्ह्यातील मानवत शहरात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनाने पाणी बचतीसाठी कठोर पावलं उचलण्याचा निर्णय घेतलाय. शहरात सुमारे सहा हजार पाचशे नळजोडण्या असून, २८ विभागांमधून नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. दररोज शहराला सुमारे २० लाख लिटर पाणी उपलब्ध करून दिलं जातं. मात्र, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याऐवजी काही नागरिकांकडून पाण्याची नासाडी होत असल्याचं प्रशासनाच्या निदर्शनास आलंय. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा वापर आवश्यकतेनुसारच करावा, असं आवाहन नगरपालिकेच्यावतीने करण्यात आलंय. पिण्याच्या पाण्याचा गैरवापर किंवा नासाडी करताना आढळल्यास संबंधित नागरिकांना दोन हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर ही दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचा इशारा देखील नगर परिषद प्रशासनाने दिला आहे.

पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणा करण्याची मागणी

सर्वोच्च न्यायालयात याचिका, निवडणूक आयोगाला नोटीस

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : देशात गेल्या काही वर्षात राजकीय अस्थिरता मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाली. तसेच, पक्षांतर बंदी कायद्यातून पळवाट काढत काही आमदार, खासदारांनी आपल्याच पक्षात स्वतंत्र गट स्थापन करत पक्षावरच दावा केल्याचंही पाहायला मिळालं. त्यामुळे, महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट देशपातळीवर चर्चेत आणि कोर्टात पोहोचली हे. आता, देशातील राजकीय पक्षांतर आणि आमदार-खासदारांच्या राजीनाम्यांच्या माध्यमातून होणाऱ्या राजकीय घडामोडींना आळा घालण्यासाठी पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणा करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, भारतीय निवडणूक आयोग आणि विधी आयोगाला नोटीस बजावत त्यांची भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर पक्षांतरबंदी कायद्यातील बदलाची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी झाली. ए. सेथू यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने आर. सतीश कुमार आणि जतीन यांनी बाजू मांडली.

अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी राजीनाम्याचा वापर?

याचिकेत आमदार आणि खासदारांकडून पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत होणारी अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी राजीनाम्याचा वापर केला जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. एखाद्या लोकप्रतिनिधीविरोधात पक्षांतराची तक्रार दाखल झाल्यानंतर किंवा अपात्रतेची कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर संबंधित लोकप्रतिनिधी विधानसभा अध्यक्ष किंवा सभापतींकडील निर्णयापूर्वीच राजीनामा देतात. त्यानंतर ते दुसऱ्या राजकीय पक्षात प्रवेश करून पुन्हा निवडणूक लढवू शकतात. या प्रक्रियेमुळे पक्षांतरबंदी कायद्याचा मूळ उद्देशच निष्प्रभ ठरू शकतो, असा युक्तिवाद याचिकेत करण्यात आला आहे.



दरम्यान, त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात असताना सरकार स्थापनेचा दावा केवळ बाहेरून सादर केलेली समर्थनपत्रे किंवा शक्तिप्रदर्शनाच्या आधारे मान्य करू नये, अशी मागणीही याचिकेत करण्यात आली आहे. तसेच, निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी झाल्यानंतर विधिवत स्थापन झालेल्या सभागृहातच बहुमताची चाचणी घेतली जावी, असेही याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी संविधानातील अनुच्छेद १८८ चा संदर्भ देण्यात आला आहे. त्यामुळे, आता या याचिकेवर निवडणूक आयोग काय भूमिका मांडणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मोदी-शाह भेटीत ८ महत्त्वाचे करार आणि ६ प्रकल्पांचे लोकार्पण

कठीण प्रसंगी भारत नेपाळच्या पाठीशी खंबीरपणे उभा असेल

पूरग्रस्त नेपाळला सावरण्यासाठी भारताची २४,००० कोटींची मदत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : नवी दिल्ली : नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरानंतर तेथील उद्ध्वस्त भागांची पुन्हा उभारणी करण्यासाठी आणि नेपाळच्या सर्वांगीण विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी २४,००० कोटी नेपाळी रुपयांचे विशेष 'विकास सहकार्य पॅकेज' जाहीर केले आहे. नेपाळचे नवे पंतप्रधान बालेन्द्र शाह हे पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच भारताच्या दौऱ्यावर आले असून, नवी दिल्लीतील भेटीदरम्यान ही मोठी घोषणा करण्यात आली. हैदराबाद हाऊस येथे दोन्ही देशांमधील उच्चस्तरीय चर्चा पार पडल्यानंतर पंतप्रधान मोदी आणि बालेन्द्र शाह यांनी माध्यमांशी संवाद साधला. ऑगस्ट महिन्यात नेपाळमध्ये आलेल्या पुरात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले, याबद्दल मोदींनी तीव्र हळहळ व्यक्त केली. कोणत्याही कठीण प्रसंगी भारत नेपाळच्या पाठीशी खंबीरपणे उभा असेल, असा विश्वास देत त्यांनी ही आर्थिक मदत जाहीर केली. या पॅकेजमागील भूमिका स्पष्ट करताना मोदी म्हणाले की, पुरामुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांचे आयुष्य पुन्हा रुळावर आणणे, तिथे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे आणि भविष्यातील नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी नेपाळला अधिक बळकट करणे, हे आमचे मुख्य ध्येय आहे.

पंतप्रधान मोदींनी बालेन्द्र शाह यांचे भारतात आत्मीयतेने स्वागत केले. काही महिन्यांपूर्वीच जगातील सर्वात तरुण पंतप्रधान म्हणून शाह यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये जे भाषण दिले, त्यातून त्यांची दूरदृष्टी स्पष्टपणे दिसून आली होती, असे कौतुक मोदींनी केले. या वर्षाच्या सुरुवातीला नेपाळच्या जनतेने शाह यांना दिलेला प्रचंड पाठिंबा हा तिथल्या तरुणाईच्या स्वप्नांचे आणि आकांक्षांचे प्रतीक असल्याचेही ते म्हणाले. भारत आणि नेपाळ यांच्यातील नाते हे केवळ दोन शेजारी देशांचे नसून, ते रक्ताच्या नात्यासारखे आपुलकीचे आणि घट्ट विश्वासाचे आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले. दोन्ही



देशांचे आनंद आणि संकटे सारखीच आहेत, तसेच विकासाच्या प्रवासात आपण एकमेकांचे सोबती आहोत, असे नमूद करत द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दौऱ्याच्या निमित्ताने भारत आणि नेपाळमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांत एकत्र काम करण्यासाठी एकूण आठ महत्त्वाचे करार करण्यात आले. या करारांमध्ये अंतराळ विज्ञान, पोलीस व सुरक्षा प्रशिक्षण, सरकारी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, आरोग्य सेवा, आयुर्वेद, पर्यावरणपूरक शहरी विकास आणि शेती-पशुपालन या विषयांचा समावेश आहे. अंतराळ आणि दळणवळण क्षेत्रात प्रगती करण्यासाठी भारताची अंतराळ संस्था 'इस्रो' आणि नेपाळचे माहिती व दळणवळण मंत्रालय यांच्यात करार झाला आहे. या करारादारे 'दक्षिण आशिया उपग्रहा'चा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी सॅटेलाईट कम्युनिकेशन नेटवर्क उभारले जाणार आहे.

पोलीस यंत्रणा आणि गुन्हे तपासातील वैज्ञानिक पद्धती (फॉरेन्सिक सायन्स) सुधारण्यासाठी दोन करार झाले आहेत. यातील पहिला करार गुजरातमधील नॅशनल फॉरेन्सिक सायन्सेस युनिव्हर्सिटी आणि नेपाळ पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाम ध्ये झाला. तर दुसरा करार भारताची राष्ट्रीय रक्षा युनिव्हर्सिटी आणि नेपाळची नॅशनल पोलीस अक्ॅडमी यांच्यात करण्यात आला. नेपाळमधील प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि लोकाभिमुख व्हावे, यासाठी भारताच्या 'नॅशनल सेंटर फॉर गुड गव्हर्नन्स'ने नेपाळच्या प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेशी करार केला आहे. या अंतर्गत नेपाळमधील सरकारी अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

आरोग्य क्षेत्रात दोन्ही देशांनी दोन करारांवर शिक्कामोर्तब केले. यामध्ये आधुनिक आरोग्य आणि वैद्यकीय सेवांसोबतच आयुर्वेद आणि इतर पारंपरिक औषधोपचार पद्धतींचा प्रसार करण्यासाठी दोन्ही सरकारांमध्ये स्वतंत्र करार झाला. याशिवाय, शाश्वत शहरी विकास तसेच पशुपालन आणि मत्स्यव्यवसायाच्या वाढीसाठी तांत्रिक मदत देण्याचे करारही पार पडले. या करारांशिवाय दोन्ही पंतप्रधानांनी सीमाभागातील वाहतूक, वीज आणि पायाभूत सुविधांशी जोडलेल्या सहा मोठ्या प्रकल्पांचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन आणि भूमिपूजन केले. यामध्ये दोन्ही देशांतील सांस्कृतिक नाते अधिक घट्ट करण्यासाठी भारतातील अयोध्या ते नेपाळमधील जनकपूर दरम्यान धावणाऱ्या 'सरयू-कमला एक्सप्रेस' रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. सीमेवरील रस्ते वाहतूक आणि व्यापार सुलभ व्हावा, यासाठी भारतातील धारचुला आणि नेपाळमधील दारचुला यांना जोडणाऱ्या नव्या मोटर पुलाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच, बनबसा येथील एकात्मिक तपासणी नाक्याचे (खउझ) भूमिपूजन करून भैरहवा, सुनौली आणि दोधरा चांदणी येथील तपासणी नाक्यांच्या सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला.

ऊर्जा क्षेत्रात मोठी झेप घेत दोन्ही नेत्यांनी ६६९ मेगावॅट वीज निर्मिती क्षमता असलेल्या 'लोअर अरुण जलविद्युत प्रकल्पा'ची पायाभरणी केली. यासोबतच नेपाळला होणारा इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी मोतिहारी-अमलेखगंज पाईपलाईनच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन केले आणि प्रस्तावित सिलीगुडी-झापा पेट्रोलियम पाईपलाईनचा भाग असलेल्या झापा येथील इंधन टर्मिनलचे भूमिपूजनही केले. नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांनी मार्च २०२६ मध्ये पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतरचा हा त्यांचा पहिलाच भारत दौरा आहे. रविवारी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी नवी दिल्लीत आगमन झाल्यानंतर, सोमवारी सकाळी त्यांनी राजघाटावर जाऊन महात्मा गांधींना आदरांजली वाहिली आणि त्यानंतर राष्ट्रपती भवनात त्यांचे शासकीय इतमामात स्वागत करण्यात आले.

संपादकीय....

दुष्काळाची दाहकता

राज्यात मोठ्या प्रमाणावर दुष्काळाचे परिणाम पाहायला मिळत असून मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात रब्बीच्या पिकांना फटका बसला आहे. तसेच, ज्वारीच्या पेरणीवरही पाऊस-पाणी नसल्याचा परिणाम जाणवत आहे. त्या पार्श्वभूम ीवर शासनाने ३१० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून शक्य ती मदत करण्यात येत आहे. मात्र, नोव्हेंबर महिन्यातच अशी परिस्थिती असल्याने उन्हाळ्यात काय परिस्थिती निर्माण होईल, अशी चर्चा गावच्या पारावर होत आहे. राज्यात यंदा दुष्काळाची दाहकता आत्तापासूनच जाणवत असून अनेक जलसाठे कोरडे पडले आहेत. शेतातील तळे, विहिरींचेही पाणी आटल्याने शेतकरी चिंतातूर आहे. जनावरांना पाणी आणि चारा देण्याचा मोठा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा आहे. तर, शहरातील नागरिकांना मुलबक पिण्याचे पाणी पुरवण्याचंही आव्हान महापालिका, नगरपालिका प्रशासनापुढे आहे. त्याच पार्श्वभूमीवर मानवत शहरात पाण्याची नासाडी करणाऱ्यांकडून २ हजार रुपये दंड आकारण्याचा निर्णय नगरपालिकेनं घेतला आहे. ऐन दुष्काळात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना, पिण्याच्या पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर आता दंडात्मक कारवाई होणार आहे. परभणीच्या मानवत शहरात पाणी वाया घालवणाऱ्या नागरिकांना दोन हजार रुपयांचा दंड आकारण्याचा इशारा नगर परिषद प्रशासनाने दिला आहे. त्यासाठी प्रशासनाकडून जाहीर प्रकटनही प्रसिद्ध करण्यात आलंय. त्यामुळे, या निर्णयावर नागरिकांच्या संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून काहींनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. तर, काहींना ह्या निर्णयाला विरोधही दर्शवला आहे. परभणी जिल्ह्यातील मानवत शहरात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनाने पाणी बचतीसाठी कठोर पावलं उचलण्याचा निर्णय घेतलाय. शहरात सुमारे सहा हजार पाचशे नळजोडण्या असून, २८ विभागांमधून नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. दररोज शहराला सुमारे २० लाख लिटर पाणी उपलब्ध करून दिलं जातं. मात्र, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याऐवजी काही नागरिकांकडून पाण्याची नासाडी होत असल्याचं प्रशासनाच्या निदर्शनास आलंय. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा वापर आवश्यकतेनुसारच करावा, असं आवाहन नगरपालिकेच्यावतीने करण्यात आलंय. पिण्याच्या पाण्याचा गैरवापर किंवा नासाडी करताना आढळल्यास संबंधित नागरिकांना दोन हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर ही दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

कर्ज मंजुरीच्या नावाखाली बँकेच्या नावाचा गैरवापर!

संबंधित व्यक्तीबाबत पोलिसांकडूनही शहानिशा; पंढरपूर अर्बन बँकेचे स्पष्टीकरण-चेअरमन सतीश मुळे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर येथील आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणासंदर्भात दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूरचे नाव तसेच बँकेत कार्यरत नसलेल्या व्यक्तींचा व्यवस्थापक म्हणून संदर्भ देऊन प्रसारमाध्यमांत वृत्त प्रसिद्ध झाले आहे. या वृत्ताच्या अनुषंगाने बँक वस्तुस्थिती स्पष्ट करीत असल्याची माहिती बँकेचे चेअरमन श्री.सतीश मुळे व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.उमेश विरधे यांनी दिली.

सदर वृत्त व एफआयआरमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या अक्षय सुरवसे या व्यक्तीचा पंढरपूर अर्बन बँकेशी संबंध असल्याचा संदर्भ देण्यात आला आहे. तथापि, अक्षय सुरवसे हे दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूरचे कर्मचारी नाहीत. त्यांचा बँकेच्या कर्मचारी वर्गाशी कोणताही संबंध नाही. तसेच एफआयआरमधील आरोपी हे बँकेचे सभासदही नाहीत व खातेदारही नाहीत.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने बँकेने सोलापूर पोलिसांशी संपर्क साधून संबंधित व्यक्तीबाबत शहानिशा केली असता, संबंधित व्यक्तीने बँकेचे नाव वापरून फसवणूक केली असल्याची माहिती पोलिसांकडून बँकेस देण्यात आली आहे. त्यामुळे बँकेचे नाव, अधिकारी व कर्ज मंजुरी प्रक्रियेचा संदर्भ देऊन नागरिकांची दिशाभूल अथवा आर्थिक फसवणूक करण्याचा प्रकार असल्यास नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगणे आवश्यक आहे.

अलीकडील काळात AI (Artificial Intelligence) तंत्रज्ञान, डिजिटल तंत्रज्ञान, बनावट कागदपत्रे, खोटे संदेश तसेच बँक अधिकारी असल्याचा बनाव करून नागरिकांना विश्वासात घेऊन आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार घडत आहेत. अशा प्रकारांमध्ये बनावट कर्ज मंजुरीपत्रे, खोटी आश्वासने अथवा विश्वासार्ह वाटणारे संदेश तयार करून लोकांची दिशाभूल केली जाऊ शकते.

ते पुढे म्हणाले, आपली पंढरपूर अर्बन बँक कोणत्याही अनधिकृत एजंट, मध्यस्थ अथवा व्यक्तीमार्फत कमिशन घेऊन कर्ज मंजूर करून देत नाही. बँकेची कर्ज मंजुरी प्रक्रिया निर्धारित कर्ज धोरण, आवश्यक कागदपत्रे, पात्रता निकष आणि सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीनुसारच पार पाडली जाते. कर्ज मिळवून देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला वैयक्तिक कमिशन अथवा रक्कम देण्याची बँकेची अधिकृत पद्धत नाही. बँकेच्या नावाचा, अधिकारी पदनामाचा अथवा कर्ज मंजुरी प्रक्रियेचा गैरवापर करून कोणी आर्थिक व्यवहार अथवा आश्वासने देत असल्यास नागरिकांनी त्यावर विश्वास न ठेवता बँकेच्या अधिकृत शाखेशी अथवा व्यवस्थापक श्री.गणेश हरिदास-९५११८६७००४ यांचेशी संपर्क साधून खातरजमा करावी.

बँकेने या प्रकरणासंदर्भात सोलापूर पोलिसांना निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच पंढरपूर अर्बन बँकेच्या नावाचा गैरवापर करणाऱ्या संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. बँकेच्या नावाचा असा गैरप्रकार निदर्शनास आल्यास संबंधितावर बँक फौजदारी स्वरूपाची कारवाई करेल असा निर्णय बँक संचालक मंडळ व प्रशासनाने घेतला आहे.

बँक ग्राहकांचा विश्वास, पारदर्शकता आणि नियमबद्ध बँकिंग व्यवहार यांना सर्वोच्च प्राधान्य देत असून, बँकेच्या नावाचा गैरवापर करून होणाऱ्या अनधिकृत प्रकारांपासून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन करीत आहे.

प्रतीक्षा जगण्याची काव्यसंग्रहास महात्मा फुले साहित्यरत्न पुरस्कार प्रदान



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील साहित्यिक परमेश्वर पालकर लिखित प्रतीक्षा जगण्याची काव्यसंग्रहास दि.२२ रोजी बार्शी येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित २० वे महात्मा फुले प्रबोधन साहित्य संमेलनात महात्मा फुले साहित्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी ज्ञानपिठावर संमेलनाध्यक्ष जेष्ठ साहित्यिक फुलचंद नागटिळक, स्वागताध्यक्ष शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ बी वाय पाटील,साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ शरद गोरे, मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे, निमंत्रक शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गौडगावचे सचिव प्रा पंडितराव लोहकरे, साहित्य परिषदेचे राज्य उपाध्यक्ष हनुमंत चिकने आदी मान्यवर उपस्थित होते.

या काव्यसंग्रहात शेती शेतकऱ्यांच्या समस्या बेरोजगारांच्या समस्या यावर पालकर यांनी प्रकाश टाकलेला आहे ग्रामीण समस्यांचा उल्लेख प्रामुख्याने या काव्यसंग्रहात दिसुन येतो

याची दखल घेत अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित संमेलनात हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले याबद्दल पालकर यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भरत सूर्यवंशी यांचा सत्कार संपन्न



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा चे मा. नगर अध्यक्ष भरत भाऊ सूर्यवंशी यांची लातूर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी निवड; लामजना पाटी येथे उत्साहात सत्कार.

औसा तालुक्यातील लाम जना पाटी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षपदी भरत भाऊ सूर्यवंशी यांची निवड झाल्याबद्दल लामजना पाटी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात त्यांचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष जीवनराव पाटील, औसा पंचायत समिती सदस्य राम बिराजदार, युवक अध्यक्ष बाळासाहेब जाधव, युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष संजय लोंढे, महाराष्ट्र प्रदेश सचिव विनोद झिरमिरे, राष्ट्रवादी जिल्हा युवक उपाध्यक्ष निशांत पाटील, युवक तालुका कार्याध्यक्ष वसीम बोपले. बजरंग बाजूळगे. रोहिदास जगताप, परमेश्वर मांडजे, अविनाश बाजूळगे, बालाजी पवार, दत्ता माडजे आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

भरत भाऊ सूर्यवंशी यांच्या निवडीमुळे पक्ष संघटनेला अधिक बळ मिळेल, तसेच आगामी काळात पक्षवाढीसाठी आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

लातूरमध्ये २१ वर्षीय आरोपीला काल अटक, आज पोलीस कोठडीतच संपवलं जीवन; नातेवाईकांचा घातपाताचा आरोप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लातूर : एखाद्या गुन्ह्यात अटक असलेल्या आरोपीच्या सुरक्षेची जबाबदीर ही पोलिसांनी असते. मात्र, पोलीस ठाण्यात आरोपींनी आपले जीवन संपवल्याचा घटना यापूर्वी देखील घडल्या आहेत. परभणीतील सोम नाथ सूर्यवंशी यांचाही पोलीस कोठडीतच मृत्यू झाला होता, त्या मृत्यूप्रकरणावरुन वातावरण चांगलंच तापलं होतं. याप्रकरणी स्वतंत्र एसआयटी देखील स्थापन करण्यात आली होती. आता, लातूर जिल्ह्यातील किनगाव पोलीस ठाण्यातही एका २१ वर्षीय आरोपीने जीवन संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, पोलिसांनी कालच आरोपीला अटक केली होती. लातूर जिल्ह्यातील अहम दपूर तालुक्यातील किनगाव पोलीस ठाण्यात एका २१ वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अमित रमेश चव्हाण असं जीवन संपवलेल्या युवकाचं नाव असून, तो अहमदपूर तालुक्यातील मरशिवणी येथील रहिवासी होता.

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयोजित समस्या-आधारित शिक्षणावरील तीन दिवसीय प्रादेशिक संशोधन परिषद आयसर पुणे येथे संपन्न

प्रकल्पाधारित शिक्षणातून विद्यार्थ्यांना समस्या सोडविण्याचे कौशल्य देण्याची गरज : प्रा. सुनील भागवत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : 'एखाद्या प्रश्नाचे उत्तर 'चॅटजीपीटी' सारख्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ॲपमधून क्षणार्धात मिळू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिकताना केवळ माहिती मिळविण्यावर किंवा पाठांतर करण्यावर अवलंबून न राहता, एआयपेक्षा अधिक चांगल्या पद्धतीने विचार करून समस्या सोडविण्याचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. 'एआय'पेक्षा सरस काम करण्याची क्षमता असेल, तरच भविष्यात करिअर आणि रोजगार टिकविता येईल,' असे मत आयसर पुणेचे संचालक सुनील भागवत यांनी शनिवारी व्यक्त केले. शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील समन्वय वाढविण्याच्या उद्देशाने सोलापूर येथील एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयसर पुणे येथे आयोजित चौथ्या 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन प्रोजेक्ट



अँड प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंग' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उच्च शिक्षणावरील परिसंवादाच्या समारोप सत्रात ते बोलत होते.

यावेळी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गोपाळकृष्ण जोशी, डेन्मार्कमधील अलबोर्ग विद्यापीठाच्या युनेस्को पीबीएल सेंटरच्या संचालिका प्रा. क्झियानग्यून डू, खणउएए चे कार्यकारी संचालक प्रा. कृष्णा वेदुला, सिंगापूर येथील कर्टिन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू व अध्यक्ष प्रा. ॲलेक्स स्टोजेव्स्की, नवी मुंबई येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील, संकल्प सेमीकंडक्टरचे संस्थापक विवेक पवार, तमिळनाडू येथील कलासलिंगम ॲकॅडमी ऑफ रिसर्च अँड एज्युकेशन विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ. एस. शसी आनंद आणि शालेय शिक्षणावरील परिसंवादाच्या समारोप सत्राला 'आयसर'च्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य उद्देश समस्याआधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब करणाऱ्या शिक्षकांची व शिक्षणतज्ज्ञांची संख्या वाढविणे, या पद्धतीच्या प्रभावी अंमलबजावणीला प्रोत्साहन देणे आणि जगभरात अवलंबल्या जाणाऱ्या सर्वोत्तम शैक्षणिक कार्यपद्धतींचा अभ्यास व आदानप्रदान करणे हा होता. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारक्षमता, समस्या सोडविण्याचे कौशल्य, सर्जनशीलता आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची वृत्ती विकसित करण्यासाठी या शिक्षणपद्धतीचा व्यापक प्रसार करण्यावर परिसंवादात भर देण्यात आला.

प्रा. भागवत म्हणाले, 'प्रकल्पाधारित शिक्षण ही काही नवीन संकल्पना नाही. औपचारिक शिक्षण सुरू झाले, तेव्हापासून समाजातील गरजा आणि समस्या सोडविण्यासाठी या शिक्षणाचा वापर केला जायचा. मात्र, कालांतराने आपण शिक्षणाच्या मूळ उद्देशापासून दूर गेलो. त्यामुळे विद्यार्थ्यांना काय शिकवायचे, ते का शिकवायचे आणि त्यातून कोणती समस्या सोडवायची, याचा विचार करून पदवी अभ्यासक्रमापासूनच शिक्षणाची रचना करणे गरजेचे आहे.'

प्रकल्प अथवा समस्याधारित शिक्षण ही आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग असलेली संकल्पना आहे. ती शिक्षणात विशेषत: शालेय स्तरावर शिस्तबद्ध पद्धतीने रुजविण्याची वेळ आली आहे. बदलत्या काळात उच्च शिक्षणाची दिशा संशोधन, नवोपक्रम आणि प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षणाकडे वळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता समाज आणि उद्योग क्षेत्रातील समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधण्याची क्षमता विकसित केली पाहिजे.

– प्रा. स्वाती कराड चाटे – कार्यकारी अध्यक्षा, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ सोलापूर

शालेय शिक्षणावरील परिसंवादाच्या समारोपप्रसंगी डॉ. नातू म्हणाले, प्रकल्प-समस्याधारित शिक्षणाची प्रक्रिया प्रश्न विचारणे, माहितीचा शोध घेणे, कल्पना मांडणे आणि उपाय विकसित करणे अशा चार टप्प्यांतून पुढे जाते. मात्र, आपल्या शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थी प्रश्न विचारण्याच्या पहिल्याच टप्प्यावरच अडखळतात. लहान वयापासून मुलांमध्ये प्रश्न विचारण्याची सवय रुजवली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती दूर करून, त्यांना काय येत नाही यापेक्षा काय येते, हे तपासणारी नवीन मूल्यमापन पद्धती विकसित करावी लागेल. विद्यार्थ्यांना आपण शिकत असलेल्या गोष्टींचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध समजला, तरच शिक्षण अर्थपूर्ण होईल.

तीन दिवस चाललेल्या या परिषदेत शोधनिबंध सादरीकरण, समांतर कार्यशाळा आणि कीनोट व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. शालेय आणि उच्च शिक्षणातील प्रकल्प व समस्याधारित शिक्षणाच्या जागतिक आणि भारतीय स्तरावरील सर्वोत्तम कार्यपद्धतींवर विशेष परिसंवादाच्या विविध सत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील शिक्षणतज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षणातील समन्वय, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रांमधील परस्पर संबंध आणि संशोधन, नवोपक्रम व उद्योजकता आदी विषयांवर झालेल्या परिसंवादात तज्ज्ञांनी विचार मांडले.

याप्रसंगी नोव्हेंबर २०२७ मध्ये सिंगापूर येथे अकराव्या आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा कर्टिन विद्यापीठाचे अध्यक्ष प्रा. अलेक्स स्टॉयचेव्हस्की यांनी केली. डॉ. प्रभा कासलीवाल यांनी स्वागत केले. डॉ. प्रीती बालीगार यांनी परिषदेतील चर्चासत्रांचा आढावा घेतला आणि प्रा. गोपाळकृष्ण जोशी यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

पंढरपुरातील प्रभाग १७ साठी पाच कोटीचा निधी मंजूर



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर नगरपालिका शहरातील प्रभाग १७ साठी तब्बल पाच कोटी रुपये चा विकास निधी मंजूर झाला आहे. मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या पाठपुराव्यामुळे मोठे यश मिळाले असून गेल्या चार दशकापासून रखडलेल्या काम ांना आता गती मिळणार आहे.

मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या पाठपुराव्याला यश

महाराष्ट्र नवनिर्माण से-नेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या शिफारशीचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेत हा निधी उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय झाला आहे याची माहिती दिलीप धोत्रे यांनी दिली आहे.

रस्त्यांच्या कामासाठी ३ कोटी ७० लाख, शाळा आणि व्यायाम शाळेसाठी एक कोटी तीस लाख, इतर विकास कामेही प्रभाग १७ मधील होणार आहेत.

निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पूर्ततीकडे वाटचाल, निवडणुकीच्या वेळी लंकेश यादव, माधुरी धोत्रे, तिच्या माध्यमातून नागरिकांना दिलेल्या विकास कामाची आश्वासने आता प्रत्यक्षात पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

अर्जुनलीतील गोदामावर अन्न सुरक्षा विभागाची धडक कारवाई; मुदतबाह्य अन्नपदार्थांच्या तारखा बदलून विक्रीचा डाव उघड

२ कोटी ६ लाखांचा अन्नसाठा जप्त; कंपनीचा परवाना निलंबित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील अर्जुनली येथे मुदतबाह्य अन्नपदार्थांच्या तारखा व किमतींमध्ये फेरफार करून त्यांची पुन्हा विक्री करण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ठाणे अन्न सुरक्षा विभागाच्या पथकाने पडघा परिसरातील अर्जुनली येथील डी एक्स पी वेंचर्स इंडिया प्रा. लि. या गोदामावर छापा टाकून तब्बल २ कोटी ६ लाख २१ हजार रुपये किम तीचा अन्नसाठा जप्त केला. विशेष म्हणजे ही कारवाई सलग दोन दिवस सुरू होती.मुदतबाह्य अन्नपदार्थांवर प्रक्रिया करून त्यांची पुन्हा विक्री केली जात असल्याच्या तक्रारी अन्न सुरक्षा विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर सहाय्यक आयुक्त योगेश ढाणे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, अन्न सुरक्षा अधिकारी के. वाय. चिपळूणकर आणि ए. व्ही. कांडेलकर यांच्या पथकाने सहआयुक्त (अन्न) डॉ. सचिन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार, १८ नोव्हेंबर रोजी संबंधित गोदामावर छापा टाकला. गोदामाची तपासणी केली असता स्पार्कलिंग वॉटर, एनर्जी ड्रिंक, सौदी कॉकटेल, सोडा, प्रीमियम सोडा वॉटर, जिंजर सोडा तसेच २ बिलोना देशी तूप यांसह एकूण १४ प्रकारचे मुदतबाह्य अन्नपदार्थ आढळून आले. या पदार्थांच्या पॅकेजिंगवरील उत्प-ादन तारीख, कालबाह्यता तारीख आणि कमाल किरकोळ विक्री किंमत बदलण्यासाठी थिनर या रासायनिक पदार्थाचा वापर केला जात असल्याचे तपासात निदर्शनास आले. याशिवाय जुन्या तारखा व किमती बदलून नव्याने छापण्यासाठी वापरली जाणारी स्टॅम्पिंग यंत्रसामग्रीही अधिकाऱ्यांना आढळली. या कारवाईत एकूण २ कोटी ६ लाख २१ हजार रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे समोर आल्याने संबंधित कंपनीचा अन्न व्यवसाय परवाना १९ नोव्हेंबर रोजी निलंबित करण्यात आला आहे. तपास पूर्ण होईपर्यंत परवाना निलंबनाची कारवाई कायम राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या आणि अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत फसवणूक करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इश-ारा अन्न सुरक्षा प्रशासनाने दिला आहे.



अक्कलकोट शहरात टिपू सुलतान जयंती निमित्त गरीब विद्यार्थ्यांना शालेय बॅग व मिठाई वाटप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : वयाच्या अठराव्या वर्षी इंग्रजांविरुद्ध पहिले युद्ध जिंकणारे शेर-ए-हिंद टिपू सुलतान यांची जयंती अक्कलकोटमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली.

टी.एस.एस फाउंडेशन तर्फे अक्कलकोट शहरातील विजय कामगार चौक येथे शेर-ए-हिंद टिपू सुल-तान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी शहरातील हिंदू-मुस्लीम बांधव,नगरसेवक समाजसेवक, व हजरत टिपू सुलतान यांचा चाहता वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

अक्कलकोट तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, नगरस-वक मुस्तफा बाळोरगी, सेनेचे अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष मोहसीन मोकाशी, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, रशीद खि-स्तके, अतिक बागव-ान, शकील खिस्तके, वसीम कुरेशी या प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी म ान्यवरांचा टिपू सुलतान फाउंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला.

या प्रमुख म ान्यवरांच्या शुभहस्ते भागातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग व मिठाई वाटप करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून उपस्थितांनी फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमाचे मनापा-सून कौतुक केले. टिपू सुलतान यांचे शौर्य, त्याग आणि देशभक्ती आजच्या तरुण पिढीसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

यावेळी मल्लिकार्जुन पाटील, नगरसेवक मुस्तफा बाळोरगी, सेनेचे अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष मोहसीन मोकाशी, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास,रशीद खिस्तके,अतिक बागव-ान, शकील खिस्तके, वसीम कुरेशी व फाउंडेशनचे सैफन शेख,बाबा गोलंदाज, ा.स.शेख, असलम रेड्डी, राजु मुल्ला,अकबर सुतार व फाउंडेशन कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहसीन मोकाशी यांनी केले तर शेवटी उपस्थित सर्वांचे आभार टी.एस.एस फाउंडेशनचे अध्यक्ष सैपन शेख यांनी मानले अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

कै. मल्लिनाथ बंडय्या स्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अक्कलकोटमध्ये गरजूंना ब्लँकेट वाटप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट /प्रतिनिधी : कै. मल्लिनाथ बंडय्या स्वामी यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त अक्कलकोट शहरातील गरजू बांधवांना ब्लँकेटचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. वडिलांनी दिलेले माणुसकीचे आणि म दतीचे संस्कार पुढे नेण्याच्या उद्देशाने शिवशंकर मल्लिनाथ स्वामी यांच्या पुढाकाराने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.



शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, शेख नूरदिन बाबा दर्गा परिसर तसेच झोपडपट्टी परिसरातील गरजू, वयोवृद्ध नागरिकांना या उपक्रमांतर्गत ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. थंडीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या या मदतीबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

याप्रसंगी ओम जिरगे, प्रभाकर म्हेत्रे, राज मद्रिकर, सागर शुक्ला, खंडू चंडके, राहुल वाडे, नितीन उनोळी, धनराज पाटील यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होते.

संपादक डॉ.संतोष शिवदास आमले यांना 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' प्रदान



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई / केतन भोज म साप्ताहिक भगवे वादळच्या वर्धापन दिनानिमित्त संपादक दत्ता खंदारे यांनी आयोजित केलेल्या भव्य सोहळ्यात पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे दैनिक युवक आधार चे संपादक डॉ. संतोष शिवदास आमले यांना 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. मुंबई येथील धारावी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार डॉ. ज्योती गायकवाड यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करत सम ाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणे, अन्यायग्रस्तांना न्याय मि ळवून देण्यासाठी आवाज उठवणे, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणे तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडींना आपल्या लेखणीतून प्रसिद्धी देणे, अशा कार्याची दखल घेत डॉ. संतोष शिवदास आमले यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पत्रकारिता ही केवळ बातम्या प्रसिद्ध करण्यापुरती मर्यादित नसून समाजातील वास्तव परिस्थिती जनतेसमोर मांडण्याची आणि लोकशाही अधिक सक्षम करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. सत्य, निर्भीडपणा, निष्प-क्षता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांच्या आधारावर पत्रकाराने आपले कार्य करणे आवश्यक असते. याच पत्रकारितेच्या आदर्श परंपरेचे स्मरण करून देणारा हा पुरस्कार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेच्या विचारांना अभिवादन करणारा ठरला.

साप्ताहिक भगवे वादळच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या सोहळ्यात पत्रकारितेच्या माध्यम ातून समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यात आला. डॉ. संतोष शिवदास आम ले यांना मिळालेल्या या पुरस्काराम ुळे त्यांच्या पत्रकारितेच्या कार्याचा सन्मान झाला असून, पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या पुरस्कारामुळे डॉ. संतोष शिवदास आमले यांच्या सामाजिक व पत्रकारितेच्या कार्याला निश्चितच नवी प्रेरणा मिळणार असून, भविष्यातही त्यांनी निर्भीड, निःपक्ष आणि लोकहितवादी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेचा वारसा जपत समाजहितासाठी कार्य करणाऱ्या पत्रकाराचा झालेला हा गौरव निश्चितच प्रेरणादायी आणि अभिम ानास्पद आहे.

वैज्ञानिक उपकरण व पोस्टर सादरीकरणाची राष्ट्रीय स्तरावर निवड; प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा!

बेंगळुरू येथील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात श्री एस. एस. शेळके प्रशालेच्या विद्यार्थिनींची दमदार कामगिरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणाऱ्या बेंगळुरू येथील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात श्री एस. एस. शेळके प्रशालेच्या विद्यार्थिनींनी आपल्या कल्पकतेची आणि बुद्धिमत्तेची प्रभावी छाप उमटवत प्रशालेचा नावलौकिक उंचावला आहे.

दिनांक २० नोव्हेंबर २०२६, शुक्रवार रोजी टाटा पॉवर लिमि टेड आणि अगस्त इंटरनॅशनल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बेंगळुरू येथे आयोजित करण्यात आलेल्या 'ऊर्जा मेळा' राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात प्रशालेच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या वैज्ञानिक उपकरणाची आणि पोस्टरची निवड होणे ही संपूर्ण प्रशालेसाठी अत्यंत अभिमानास्पद व गौरवास्पद बाब ठरली आहे.

या प्रदर्शनात इयत्ता दह-ावीतील कु. श्रेया पोमाजी व कु. प्रीती कणमुसे यांनी तयार केलेल्या Solar Power Based Multipurpose Umbrella या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक उपकरणाची निवड करण्यात आली. सौरऊर्जेचा प्रभावी वापर करून बहुउपयोगी छत्रीची संकल्पना साकारण्याचा या विद्यार्थिनींचा प्रयत्न पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि ऊर्जा संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्व-पूर्ण आहे.

तसेच इयत्ता दहावीतील कु. महेक कुरेशी हिने सादर केलेल्या प्रदूषण - वातावरणातील बदल या विषयावरील पोस्टरचीही राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली. पर्यावरण प्रदूषण आणि हवामान बदल यांसारख्या ज्वलंत समस्यांकडे लक्ष वेधण-ारे तिचे पोस्टर विशेष उल्लेखनीय ठरले.

या यशस्वी विद्यार्थिनींना विज्ञान विभागप्रमुख *इमाम कासिम बागवान*, शिवशरण गवंडी, दत्तात्रय होटकर, प्रदीप पाटील, शिवलिंगप्पा गंगा, म ल्लम्मा सोमेश्वर, आरती बिराजद-ार, माने सर, पांढरे सर, श्रीशैल बंडगर आणि स्वामी सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन मा. श्री बसवर-ाज शेळके सावकार, संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्रशालेच्या प्राचार्या सौ. राजश्री बसवराज शेळके ताई, पर्यवेक्षिका सौ. शैलशिल्पा जाधव, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि ग्राम स्थांनी यशस्वी विद्यार्थिनींचे मनः पूर्वक अभिनंदन केले. तसेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि पुढील वैज्ञानिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



कल्पक विचारांना विज्ञानाची जोड आणि मेहनतीला मार्गदर्शन लाभले की यशाची नवी शिखरे गाठता येतात!

शाळेच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार असून, श्री एस. एस. शेळके प्रशालेच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रगतीचा हा अभिमानास्पद टप्पा आहे.

निवृत्तीवेतनधारकांनी सन २०२६-२७ साठी डिजिटल हयातीचा दाखला सादर करावा

जिल्हा कोषागार कार्यालयात २६ नोव्हेंबर रोजी मार्गदर्शन मेळावा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर, (जिमाका) : जिल्हा कोषागार कार्यालयाकडे निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारकांनी सन २०२६-२७ साठी डिजिटल हयातीचा दाखला (Digital Life Certificate - DLC) सादर करावा, असे आव-ाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्याबाबत निवृत्तीवेतनधारकांना मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी गुरुव-ार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून संबंधित उपकोषागार कार्यालयांम ध्ये मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्याची सुविधा

निवृत्तीवेतनधारकांना https://jeevanpraman.gov.in या जीवन प्रमाण संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीने डिजिटल हयातीचा दाखला सादर करता येईल. तसेच अँड्रॉइड स्मार्टफोनवर (जीवन प्रमाण) प्लिकेशन डाउनलोड करूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येईल. मेळाव्यास उपस्थित राहताना निवृत्तीवेतनधारकांनी स्वतःचा मोबाईल, आधारकार्ड, निवृत्तीवेतन आदेश (झझज) आणि बँक पासबुकाची प्रत सोबत आणावी, असे आवाहन कोषागार अधिकारी जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर डॉ. वैभव राऊत यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :

- ई-मेल : solapur.pen-sion@gmail.com

- दूरध्वनी : (०२१७)२७३१०३६

डफरीन चौक आयटीआय (मुलींची), सोलापूर येथील आलिशा शेख हिचा भारतात प्रथम क्रमांक

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विविध व्यवसायांचे प्रशिक्षण पूर्ण करून उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींच्या यशाचा गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने देशातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दरवर्षी एकाच दिवशी कौशल्य दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात येतो. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विविध व्यवसायांचे प्रशिक्षण पूर्ण करून उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींच्या यशाचा गौरव व कौतुक करण्यासाठी हा सम ारंभ आयोजित केला जातो. यावेळी संस्थेतील प्रत्येक व्यवसायातून प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा सन्मान करण्यात येतो, तर इतर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण केले जाते.



यावर्षी डफरीन चौक येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची), सोलापूरच्या टेक्स्टाईल वेट प्रोसेसिंग टेक्निशियन या दोन वर्षांच्या अभियांत्रिकी व्यवसायातील प्रशिक्षणार्थी आलिशा शेख हिने अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा २०२६ मध्ये ९६ टक्के गुण मिळवून संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या नावलौकिकात मोलाची भर पडली असून, संस्थेसाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे. या यशासाठी तिला शिल्पनिदेशक श्री. अंबादास लोला यांचे मार्गदर्शन लाभले.

आज डफरीन चौक येथील महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजित कौशल्य दीक्षांत समारंभात आयएमसीचे अध्यक्ष श्री. प्रफुलकुमार वेद आणि प्राचार्या कु . इंदिरा रणभिडकर यांच्या शुभहस्ते आलिशा शेख हिचा विशेष सत्कार करण्यात आला. यासोबतच संस्थेतील प्रत्येक व्यवसायातून उत्त- ीर्ण झालेल्या प्रथम तीन क्रमांकाच्या प्रशिक्षणार्थींचा ही यथोचित सन्मान करण्यात आला. प्रमाणपत्र वितरण आणि गुणवंत प्रशिक्षणार्थींच्या सत्काराने कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला गटनिदेशक श्री. एम. ए. पाटील, गटनिदेशक श्रीमती आर जे शिकलगार, शिक्षकवृंद, कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विवेक चंदालिया यांनी केले.

समारंभ यशस्वी करण्यासाठी श्री. टी. बी. तांबे, श्री. पी. एस. सुतार, श्री. एस. बी. कोळेकर, श्रीमती एस एम भीमनवरू, कुमारी पी व्ही दराडे, श्री.ए के तांबोली, श्री. ए एस दिल- पाक, श्री. ए ए सय्यद सर, सर्व शिक्षक, कर्मचारीवृंद आणि प्रशिक्षणार्थींनी विशेष परिश्रम घेतले.

आलिशा शेख हिच्या या उज्ज्वल यशाबद्दल तिचे मनःपूर्वक अभिनंदन! तिचे यश इतर प्रशिक्षणार्थींसाठी प्रेरणादायी ठरो आणि भविष्यातही ती अशीच यशाची नवनवी शिखरे गाठो, ही सदिच्छा!

पंढरपूरच्या आयआयटी कॉम्प्युटर्सचा राज्यात डंका!

सलग सहा वर्षे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडून गौरव; एमएस-सीआयटी प्रवेशात महाराष्ट्रात प्रथम क्रमांक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : संगणक शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पंढरपूर येथील आयआयटी कॉम्प्युटर्सने यशाची परंपरा कायम राखत पुन्हा एकदा राज्यस्तरावर मानाचा सन्मान मिळविला आहे. सन २०२६ मध्ये महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या सर्व अभ्यासक्रम ांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल संस्थेला विशेष प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे, संस्थेने सलग सहा वर्षे हा सन्मान मिळविण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच एमएस-सीआयटी अभ्यासक्रम ासाठी महाराष्ट्रातून सर्वाधिक प्रवेश नोंदविल्याबद्दल संस्थेला महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाचे संगणक प्रशिक्षण केंद्र म्हणूनही गौरविण्यात आले आहे.

सोलापूर येथील निर्मलकुम ार फडकुले सभागृहात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे वरिष्ठ महाव्यवस्थापक अतुल पतोडी व अमित रानडे, लातूर प्रादेशिक शिक्षण केंद्राचे महेश पत्रिके आणि सोल- ापूर जिल्हा व्यवस्थापक रोहित जेऊरकर यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. संस्थेच्या वतीने नितीन आसबे, दत्ता कळकुंबे, रोहिणी मांजरे आणि वैष्णवी पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला. या कार्यक्रमाला सोलापूर जिल्ह्यातील सर्व संगणक प्रशिक्षण संस्थांचे संचालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना दर्जेदार संगणक शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी आयआयटी कॉम्प्युटर्स सातत्याने कार्यरत आहे. संस्थेच्या या यशामागे संचालकांचे मार्गदर्शन, शिक्षक व कर्मचाऱ्यांची मेहनत, विद्यार्थ्यांचा विश्वास आणि पालकांचे सहकार्य यांचा मोलाचा वाटा आहे.



या दुहेरी यशामुळे पंढरपूरच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संस्थेवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पाटबंधारे विभाग पंढरपूर, (भाटगर कॅनल ऑफिस) या ऑफिसचा कारभार उंटावर बसुन शेळ्या राखणे असा भोंगळ प्रकार उघडकीस



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कासेगांव/प्रतिनिधी : धनाजी मधुकर कळकुंबे रा. कासेगाव यांच्या शेतजमि नीत प्रत्यक्षरित्या भूईपाटाद्वारे पाणी जातच नाही याची खात्री न करताच २११८१ / रु एकवीस हजार एकशे एक्याअंशी रुपये) एवढी पाणीपट्टी ऑफिसच्या रजिस्टरला दाखवत आहेत.

साधारण दोन वर्षांपूर्वी त्यांच्या शेतातील १ एकर क्षेत्राला इलेक्ट्रिक मोटरच्या साह्याने पाणी उचलून पाणी दिले होते. त्यावेळी त्या शेतकऱ्यांने झिरो कर्मचारी असणारे यांना १,००० रुपये रोख दिलेले आहेत.या व्यतिरिक्त माझ्याकडे भाडगर कॅनलचे पाणी येत नसल्याने मी कधीही परत उचल पाणी घेतले नाही तरीही म ाझ्याकडे २११८१ /- रुपये बाकी असल्याचे सांगितले जात आहे. असे उदगार धनाजी कळकुंबे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आणि सदर रकमेचा कोणताही अधिकृत लेखी हिशोब झिरो कर्मचारी असणारे किंवा पाटबंधारे ऑफिसनेहि मला कधीहि कळवलेले किंवा दिला नाही.

तसेच धनाजी मधुकर कळकुंबे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलत असताना सांगितले की आज दि २३/११/२०२६ रोजी चौकशी करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे तरी या माध्यमातून संबंधित अधिकारी पंढरपूर आणि तालुक्याचे आमदारसाहेब यांना नम्र विनंती केली आहे की,



माझ्या शेताला प्रत्यक्ष किती क्षेत्रासाठी पाणी मिळते, याची चौकशी करावी.

यक्ष पाणी मिळत असल्यास शासनाच्या नियमानुसार योग्य पाणीपट्टी निश्चित करून मला भरण्यास सांगावे.

माझ्याकडे सांगितलेल्या २०१८१ /- रुपयांच्या बाकी रकमेचा अधिकृत लेखी हिशोब व पाटबंधारे ऑफिसने कश्याची आकारणी केली आहे त्याचा आधार द्यावा. यापूर्वी दिलेल्या १,००० रुपयांची नोंद तपासावी.म ाझी कोणतीही शासकीय पाणीपट्टी थकविण्याची इच्छा नाही. मात्र प्रत्यक्ष पाहणी व चौकशी करून शासन नियमानुसार जी अधिकृत पाणीपट्टी असेल ती भरण्यास मी तयार आहे.तरी प्रत्यक्ष स्थळप- ाहणी करून योग्य तो निर्णय घ्यावा संबंधित अधिकारी तालुक्याचे आमदार यांना माझी नम्र विनंती.

धनाजी मधुकर कळकुंबे यांनी सर्व ग्रामस्थां प्रसार म ाध्यमांशी बोलत होते. की अश्या प्रकारची थकबाकी कासेगांवातील अनेक शेतकऱ्यांकडे असल्याचे निदर्शनास आले आहे असेही धनाजी कळकुंबे सांगितले याची लवकरात लवकर सकोल चौकशी व्हावी चौकशी न झाल्यास मी व कुटुंब व अनेक ग्रामस्थांच्या यांच्या वतीने उपोषणाचा मार्ग स्वीकारणार असल्याचे सांगितले.

नांदुर येथे लहुजी शक्ती सेनेची बैठक उत्साहात संपन्न



पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बैठकीसाठी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ; महासचिव बालाजी भाऊ गायकवाड यांचे आ- वाहन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : बीड जिल्ह्या- तील केज तालुक्यातील मौजे नांदुर येथे लहुजी शक्ती सेनेच्या वतीने सामाजिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सामाजिक विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजा- तील विविध प्रश्न, तरुणांच्या समस्या व संघटनेची पुढील दिशा यावर विचारमंथन करण्यात आले.

या प्रसंगी लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजी भाऊ गायकवाड व मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे यांचा समाज बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

तत्पूर्वी क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या चौकाचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

तसेच पंढरपूर येथे दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय बैठकीसाठी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लहुजी शक्ती सेनेचे महासचिव बालाजी भाऊ गायकवाड यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुकाराम लोंढे, अनिल लोंढे, अक्षय लोंढे, लहू बापू कसबे, वैभव कसबे, अण्णा पाटोळे, विकास ताटे, बाबुराव आलाट, चंद्रकांत शिंदे, अश्फाक सय्यद, गणेश गायकवाड, कविता थोरात, सित- ाराम लोंढे, बायडाबाई पाटोळे, विशाल पाटोळे यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहाड रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीला गती देण्यासाठी महापौरांची आढावा बैठक; काम लवकर सुरू करण्याचे सक्त निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी बाळासाहेब अहिरे/ उल्हासनगर : शहाड रेल्- वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचा प्रश्न मार्गी लावून प्रत्यक्ष बांधकामाला लवकरात लवकर सुरुवात करण्यासाठी उल्हास- नगर महानगरपालिका प्रशास- नाने हालचालींना वेग दिला आहे. याच पार्श्वभूमीवर सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६ रोजी महापौर ड. अश्विनी कमलेश निकम यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीला स्थायी समिती सभापती कलवंतसिंग सहोता (बिट्टू भाई), अतिरिक्त आयुक्त धीरज चव्हाण, शहर अभियंता निलेश शिरसाठ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घुले यांच्यासह पाणीपुरवठा विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रेल्वे विभाग, एमएमआरडीए, वाहतूक पोलीस, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



बैठकीमध्ये शहाड रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्पाच्या कामात येणाऱ्या अडचणी, विविध विभागांच्या परवानग्या तसेच विभागांमधील सम न्वय यावर चर्चा करण्यात आली. विशेषतः रेल्वे विभाग आणि विद्युत विभागाने परस्पर समन्वय साधून प्रकल्पातील तांत्रिक व प्रशासकीय अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्दे श देण्यात आले.

प्रलंबित बाबी तातडीने मार्गी लावण्याचे आदेश

नवीन उड्डाणपुलाच्या बांधकाम ाला सुरुवात करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व अडचणी आणि प्रलंबित बाबींचा तातडीने निपटारा करून पुनर्बांधणीचे काम लवकरात लवकर सुरू करावे, असे सक्त निर्देश महापौर ॲड. अश्विनी कमलेश निकम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

शहाड रेल्वे उड्डाणपुलाची पुनर्बांधणी हा परिसरातील वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय असल्याने या प्रकल्पाला गती मिळण्याच्या दृष्टीने झालेल्या या बैठकीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. आता संबंधित विभागांच्या समन्वयातून प्रत्यक्ष बांधकाम कधी सुरू होते, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे, अशी माहिती उल्हासनगर महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागामार्फत देण्यात आली.

ऐतिहासिक संदर्भांची सत्यता आणि नव्या पिढीशी संवाद साधण्यावर कार्यशाळेत भर

आंबेडकरी चळवळीच्या वैचारिक प्रसारासाठी सोलापुरात प्रशिक्षण शिबिर



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना आधुनिक काळातील सामाजिक आणि डिजिटल आव्हानांचा सामना करण्यासाठी सक्षम करण्याच्या हेतूने सोलापुरात कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. आंबेडकरी विचारांचा व्यापक प्रसार, सामाजिक माध्यमांवरील माहितीची विश्वासार्हता आणि संघटनात्मक कार्यातील कौशल्यविकास या विषयांना शिबिरात प्राधान्य दिले जाणार आहे.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर एंटरप्रेन्युअर्स अँड सोशल इन्फ्लुएन्सर्स कल्चरल सोसायटी'च्या वतीने मंगळव- ारी सकाळी १० वाजता सम्राट चौक परिसरातील एस. ई. एस. पॉलिटेक्निक येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बहुजन कर्मचारी संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डी.आर. ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाची म्हणजेच केडर कॅम्पची प्रक्रिया पार पडणार आहे.

सध्याच्या काळात सोशल मीडिया हे जनमत घडविण्याचे आणि सामाजिक विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम ठरत आहे. मात्र, या माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या माहितीची सत्यता तप- ासणे आणि ऐतिहासिक घटनांचे अचूक संदर्भ मांडणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना माहितीचे विश्- लेषण, तथ्य पडताळणी आणि जबाबदार डिजिटल संवाद याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

आंबेडकरी विचारांची मांडणी करताना नव्या पिढीच्या अपेक्षा आणि बदलत्या सामाजिक विचार कसा करावा, यावरही शिबिरात चर्चा होणार आहे. विविध पिढ्यांतील कार्यकर्त्यांमध्ये वैचारिक देवाणघेवाण घडवून आणणे, सामाजिक प्रश्नांबाबत जागरूकता वाढविणे आणि संघटनेच्या कार्याला अधिक परिणामकारक दिशा देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

कार्यकर्त्यांमध्ये नेतृत्वक्षमता, निर्णय घेण्याची क्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविण्यासाठी प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत. आंबेडकरी विचारांचा प्रसार केवळ पारंपरिक म ाध्यमांपुरता मर्यादित न ठेवता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचविण्याची दिशा या शिबिरातून मिळणार आहे. तरी शहरा- तील आंबेडकरी विचारांच्या युवक आणि युवतींनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात येत आहे. यावेळी अनुराग सुतकर, मितेश काळे, दिपक शिराळकर, कुणाल बाबरे,ड. सुम ती कांबळे, धम्मपाल वाघमारे, संयुक्ता सरवदे, शितल कांबळे, करण गायकवाड आदी उपस्थित होते.